आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...
देशदूत

पान ३
कृषिमंत्रिपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकी
मांस विक्री करणाऱ्यास मारहाण
शेवटचे पान
अंतिम फेरीचे तिकीट कुणाला?
इंग्लंड-वेस्ट इंडिज यांच्यात आज निर्णायक सामना
आफ्रिका खेळणार झिम्बाब्वे विरुद्ध सराव सामना

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक २६४ । रविवार, दि. १ जून २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

राज-का-रण

तुझ्या गळा, माझ्या गळा गुंफू ऐक्याच्या माळा...

केवळ परिस्थितीच नव्हे तर कार्यकर्तेही पूर्वीसारखे राहिलेले नाहीत. पूर्वी एका आदेशाने सारा महाराष्ट्र बंद व्हायचा. आता गल्ली बंद झाली तरी खूप! झालेले बदल स्वीकारून नव्या जमान्याच्या गरजा ओळखायला हव्यात. ताठरपणा सोडून लवचिक व्हायला शिकावे लागेल. भावनेवर स्वार होण्यापेक्षा वास्तवाचे भान ठेवले तर दोघा ठाकरे बंधूंना बरेच काही पुन्हा कमावता येऊ शकते.

वाचा शब्दगंधमध्ये

आज निर्णायक बैठक

सिंहस्थ तयारीला मिळणार गती; मुख्यमंत्री, आखाडाप्रमुख एकाच व्यासपीठावर

नाशिक । प्रतिनिधी

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत रविवारी (दि. १ जून) दुपारी १२ वाजता होणाऱ्या महत्त्वपूर्ण बैठकीची तयारी पूर्ण झाली असून ही बैठक अत्यंत निर्णायक ठरणार आहे. यावेळी प्राधिकरण, विकास आराखडे, निधीचे वितरण आणि कामांच्या अंमलबजावणीस गती देण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय अपेक्षित आहेत. मुख्यमंत्री, मंत्री आणि आखाडाप्रमुख हे आज एकाच व्यासपीठावर येणार असल्याने या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या बैठकीत नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील वैष्णव आणि शैव साधूंच्या सर्व आखाडा प्रतिनिधींच्या प्रमुख उपस्थितीत सिंहस्थातील अमृत स्नानाच्या तारखा जाहीर केल्या जाणार पान १० वर

आखाड्यांचा एकजुटीसाठी प्रयत्न

त्र्यंबकेश्वर । वार्ताहर

आखाडा परिषदेतील अंतर्गत वादामुळे प्रशासनाला निर्णय घेण्यासाठी मोकळीक मिळू नये यासाठी साधू आखाड्यांमध्ये एकजूट असावी यासाठी त्र्यंबकेश्वर येथील आखाड्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

प्रयाग कुंभमेळ्यात आखाडा परिषद १३ आखाड्यांमुळे तीन ठिकाणी गटतटात विभागली होती. त्र्यंबकेश्वरमध्ये १० शैव आखाड्यांचे साधू तर नाशिकला तीन वैष्णव आखाड्यांचे साधू स्नान करतात. सिंहस्थाचे नियोजन करताना आखाडा परिषदेतील गटबाजी प्रशासनाच्या पथ्यावर पडू नये यासाठी त्र्यंबकेश्वरमधील १० आखाडे एकसंध राहतील यादृष्टीने साधू-महंत वरिष्ठ पातळीवर समन्वय करत असल्याचे समजते. महाराष्ट्राला एकमेव नागा साधूंचा कुंभमेळा त्र्यंबकेश्वरमध्ये भरतो. पान १० वर

दीड हजार एकर जागा आरक्षणाची मागणी

सिंहस्थासाठी दीड हजार एकर जागा कायमस्वरुपी आरक्षित करा, शाहीस्नानाऐवजी अमृतस्नान म्हणा, सिंहस्थ प्राधिकरणामध्ये साधू-महंतांचे प्रतिनिधी घ्या, यासाठी नाशिकमधील तिन्ही आखाडे मुख्यमंत्र्यांकडे आग्रह धरणार आहेत. याबाबतची माहिती निर्मोही आखाड्याचे महंत राजेंद्रदास महाराज यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. तपोवनात सर्व महंतांची बैठक झाली. त्यानंतर ते म्हणाले की, पूर्वी दीडशे खालसे होते. आता ते दीड हजार झाले आहेत. साधू-महंतांची संख्या प्रचंड वाढली आहे. त्यात काही हिंदुत्ववादी संस्था जागेची मागणी करत आहेत. त्या सर्वांची जागेची मागणी तपोवनात पूर्ण होणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षांत जागा कमी पडत आहे. म्हणूनच आता दीड हजार एकर जागा आरक्षित करावी, अशी आमची मागणी आहे. तसेच शाहीस्नान हा शब्द मुघलांशी संबंधित आहे. सिंहस्थ पर्वणीतील स्नानाला अमृत पान १० वर

चोख पोलीस बंदोबस्त

शहर व ग्रामीण पोलिसांनी सीएम दौऱ्यानिमित्त शनिवारी (दि.३१) दौरा मार्गावर रिअलसल केली. यावेळी सुरक्षा ताफा, तत्कालीन नियोजन, सुरक्षा व्यवस्था, ठिकाणे आदींचा आढावा घेण्यात आला. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आयोजित सातही कार्यक्रमास ग्रामीण व शहराच्या हद्दीतील स्थानिक पोलीस ठाणे व मुख्यालयासह गुन्हे शाखा व क्यूआरटीसा बंदोबस्त तैनात असणार आहे.

बिबट्याच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू

ओझे । वार्ताहर

बिबट्याच्या हल्ल्यात पाच वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. ही घटना दिंडोरी शहरालगत असलेल्या जाधव वस्ती येथे रात्री ९ ते ९.३० वाजेच्या सुमारास घडली. रूद्र अमोल जाधव असे मृत बालकाचे नाव आहे.

याबाबत माहिती अशी की, रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास रूद्रला घेऊन त्याचे आजोबा हाताला धरून घराकडे निघालेले होते. यावेळी परिसरात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला करून आजोबांच्या हातातील चिमुरडा ओढून नेला. आजोबांनी आरडाओरड केल्यानंतर परिसरातील नागरिकांनी धावपळ करत मुलाची बिबट्याच्या तावडीतून सुटका केली. जखमी अवस्थेत मुलाला दिंडोरी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथे डॉक्टरांनी मुलाचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. बिबट्याने डोळ्यांदेखत नातवाला ओढून नेल्याने आणि एका महिन्याच्या अंतराने बिबट्याने दुसरा बळी घेतल्याने याविरोधात संतप्त झालेल्या नातलग आणि ग्रामस्थांनी दिंडोरी रुग्णालय परिसरात चक्काजाम तसेच वनविभागाच्या कार्यालयाजवळ ठिय्या आंदोलन केले. घटना घडूनही पोलीस हजर नसल्याने यावेळी नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनांत वाढ झाल्याने तसेच बिबट्या मानवी हल्ले करत असल्याने वनविभागाने तत्काळ बिबट्या जेरबंद करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

सिंदूर हे परंपरेचे प्रतीक : मोदी

भोपाळ । वृत्तसंस्था



सिंदूर हे आमच्या परंपरेचे प्रतीक आहे, आता ते भारताच्या शौर्याचे प्रतीक आहे. 'ऑपरेशन सिंदूर' हे आपल्या नारीशक्तीच्या सामर्थ्याचे प्रतीक बनले आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

शनिवारी मध्य प्रदेशातील भोपाळ येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला सक्षमीकरण महासंमेलनात पंतप्रधान मोदी सहभागी झाले आणि अनेक प्रकल्पांची सुरुवात केली. याचदरम्यान जाहीर सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर हे दहशतवादाविरुद्धचे सर्वात मोठे ऑपरेशन आहे. आपल्या सैन्याने दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले आहेत. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केवळ भारतीयांचे रक्त सांडले नाही तर त्यांनी आपल्या संस्कृतीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आमच्या समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. दहशतवाद्यांनी भारताच्या नारीशक्तीला आव्हान दिले आहे. हे आव्हान दहशतवाद्यांसाठी आणि त्यांच्या आकांसाठी काळ ठरले आहे. ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या इतिहासातील दहशतवाद्यांविरुद्धचे सर्वात मोठे आणि सर्वात यशस्वी ऑपरेशन आहे, असे पंतप्रधानांनी म्हटले आहे.

आता आम्ही दहशतवाद्यांना पान १० वर

सुनील केदार

यतीन कदम

सुनील बच्छाव

भाजपच्या बावीस जिल्हाध्यक्षांची नियुक्ती

मुंबई । प्रतिनिधी

महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून महाराष्ट्र प्रदेश भाजपने संघटनात्मक बदल केले असून शनिवारी उर्वरित २२ नव्या जिल्हाध्यक्षांच्या नियुक्ती जाहीर केल्या. भाजपच्या दुसऱ्या यादीत नाशिकमधील जिल्हाध्यक्षांचा समावेश आहे. नाशिक शहराध्यक्ष पदाची माळ सुनील केदार यांच्या गळ्यात पडली आहे. नाशिक दक्षिणच्या जिल्हाध्यक्षपदी सुनील बच्छाव तर नाशिक उत्तरच्या जिल्हाध्यक्षपदी यतीन कदम यांची निवड करण्यात आली आहे. (सविस्तर पान १० वर)

विद्यार्थिनींचा लैंगिक छळ; नर्सिंगचा प्राचार्य अटकेत

नाशिक । प्रतिनिधी

ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या महाविद्यालयाच्या प्राचार्यानेच चार अल्पवयीन पीडित विद्यार्थिनींशी अंगलट करून लैंगिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

द्वारका सर्कल येथील गणपतराव आडके इन्स्टिट्यूट कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये पहिल्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या सतरा ते अठरा वयोगटातील विद्यार्थिनींसोबत हा प्रकार घडला. छळ असह्य होत असल्याने चारही विद्यार्थिनींनी पालकांच्या मदतीने भद्रकाली पोलीस ठाणे गाठून संशयित प्राचार्य डॉ. प्रवीण रमेश घोलप (४०, रा. पोलीस लाईनरोड, पाथर्डी शिवार, नाशिक) याच्याविरुद्ध विनयभंग, लैंगिक छळ व लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमान्वये (पोक्सो) व ॲट्रॉसिटी कायद्यातील तरतुदींनुसार फिर्याद नोंदवल्या आहेत. त्यानुसार त्याला अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, प्राचार्य डॉ. घोलपविरोधात आणखी तक्रारी वाढण्याची शक्यता असून त्यादृष्टीने तपास सुरू आहे. ज्या पीडितांचा शारीरिक, मानसिक व लैंगिक छळ झाला आहे त्यांनी नाशिक शहर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. दरम्यान, घोलप याला चारही स्वतंत्र गुन्ह्यांत अटक होणार आहे.

चौघांचा बुडून मृत्यू

चाकण । पोहायला गेलेल्या चार अल्पवयीन मुलांचा दमछाक होऊन बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना काल दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास घडली. चाकणजवळील कडाचीवाडी (ता.खेड) गावच्या हद्दीतील पाझर तलावात हा प्रकार घडला. स्थानिक नागरिकांच्या मदतीने पोलिसांनी चिमुरड्यांचे मृतदेह बाहेर काढले. हृदय हेलावून टाकणाऱ्या या घटनेने चाकण परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आमदाराला शिक्षा

लखनौ । उत्तर प्रदेशातील कुख्यात गँगस्टर मुख्तार अन्सारीचा मुलगा आमदार अब्बास अन्सारी याला प्रक्षोभक वक्तव्याच्या प्रकरणात न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. यामुळे अन्सारीची आमदारकी धोक्यात आली आहे. याचबरोबर तीन हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. मऊ जिल्ह्यातील एमपी-एमएलए न्यायालयात मुख्य न्यायदंडाधिकारी के.पी. सिंह यांनी ही शिक्षा सुनावली. २०२२ च्या उत्तर प्रदेशातील मऊ विधानसभा निवडणुकीदरम्यान हा प्रकार घडला होता.

बारा जणांना चिरडले

पुणे । पुण्यात मध्यवर्ती भागात सदाशिव पेठेत असलेल्या भावे हायस्कूलजवळ एका कारचालकाने १२ जणांना उडवल्याची घटना शनिवारी (दि.३१) सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास घडली. यात जखमी असलेले सर्वजण एमपीएससीची तयारी करणारे विद्यार्थी असल्याचे निष्पन्न झाले आहे. चालक जयराम शिवाजी मुळे (२७, रा. बिबवेवाडी) याला विश्रामबाग पोलिसांनी ताब्यात घेतले असून तो मद्यधुंद असल्याचे सांगितले जात आहे. जखमी विद्यार्थी एका चहाच्या टपरीवर चहासाठी एकत्रित आले होते.

सावधान, महाराष्ट्र!

महाराष्ट्र आज एक सर्वाधिक प्रगत राज्य आहे. याविषयी दुमत असण्याचे कारणच नाही. महाराष्ट्राची महती सांगताना केवळ देशातल्या अन्य राज्यांशीच तुलना करून थांबता येत नाही. जगातल्या काही अव्वल देशांशी महाराष्ट्राच्या एकूण कर्तृत्वाची बरोबरी आजही होऊ शकते. त्यामुळेच आजही महाराष्ट्राचे गुंतवणूकदारांना असणारे आकर्षण कायम आहे.

हे सगळे सत्य असले तरी विशेषतः गेल्या दहा वर्षांमध्ये अन्य काही राज्ये जणू खडबडून जागी झाली आहेत. विशेषतः गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू आणि अलीकडे चक्क उत्तर प्रदेशदेखील. बाकीच्या राज्यांनी देशांतर्गत असणाऱ्या स्पर्धेमध्ये अचंबित करणारी मुसंडी मारली आहे. उदाहरणार्थ सन २०२३-२४ मध्ये गुजरात राज्यातल्या नागरिकांचे सकल उत्पन्न राष्ट्रीय सरासरी उत्पन्नाच्या सुमारे १६१ टक्के इतके झाले आहे. महाराष्ट्रीय नागरिकांचा आकडा आहे १५० टक्के ! मुद्दा केवळ आपल्यापेक्षा पुढे कोण जातो आहे हा नाही. म्हणजे आपण आपल्या गतीने पुढे सरकत आहोत आणि मागून येऊन कुणी आपल्या पुढे गेले हे एखाद्या वेळी समजण्यासारखे आहे. पण चिंता या बाबीची आहे की महाराष्ट्राचा वेग कमी होतो आहे. उदाहरणार्थ २०१०-२०११ सालच्या सुमारास महाराष्ट्राचा राष्ट्रीय सकल उत्पन्नाचा वाटा सुमारे १५.२ टक्के असायचा तो गत २०२३-२४ मध्ये १३.३ टक्के आला आहे. अर्थवाढीचा दर २०२२-२३ मध्ये ९.४ टक्के होता. तो २०२३-२४ मध्ये ७.६ टक्क्यांवर आला आहे. सेवा उद्योगाची वाढ २०२३-२४ मध्ये ८.३ टक्के होती. पण २०२४-२५ मध्ये वाढीचा अंदाज ७.८ टक्के आहे. उद्योग क्षेत्राचा अंदाज तर ४.९ टक्क्यांवर आला आहे, आधी ६.२ टक्के होता. २०२३-२४ मध्ये वस्तूंच्या निर्यातीचे आकडे तर चिंताजनक आहेत. गुजरातमधून दणदणीत १३४.४ बिलियन डॉलर्स (USD) इतक्या वस्तूंची निर्यात झाली. महाराष्ट्र राज्य निम्म्यावर आले आहे. राज्यातून ६७.२ बिलियन डॉलर्सची वस्तू निर्यात गेल्यावर्षी झाली.

अशी आणखी काही आकडेवारी तपासून बघितली जाऊ शकते, आकडेवारीची अचूकतादेखील वेगवेगळ्या माध्यमांमध्ये तपासली जाऊ शकते. पण एका सत्याला सामोरे जावे लागेल ते हे की महाराष्ट्राच्या अर्थनिर्मितीच्या चक्राचा वेग आता चिंता करण्यासारखा झाला आहे. बाकीच्या राज्यांनी विशेषतः औद्योगिक परिसंस्थेला (Ecosystem) जितके महत्त्व दिले आहे, तितके महाराष्ट्रात आज दिले जात नाही. श्रीमंतीचा गर्व आल्यावर जसे एखाद्या कुटुंबाची वा व्यक्तीची कचकून काम करण्याची उर्मी विरते तसे काहीसे महाराष्ट्राचे झाले आहे काय? असा प्रश्न मला पडतो. उदाहरणार्थ लघु आणि मध्यम उद्योग जे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत ते आज जणू खिजगणतीतदेखील नाहीत. हे उद्योग जर पिछाडीवर गेले तर अशा गावाची, जिल्ह्याची किंवा राज्याची अर्थव्यवस्था डगमगते, असे माझे मत आहे. कॉलेजातून बाहेर पडणाऱ्या मुलांना जर आज स्वतःचे काही उत्पादन सुरू करायची इच्छा असेल तर ते आज महाराष्ट्रात शक्य नाही. गेल्या दहा वर्षांतल्या हजारो मुलांच्या केवळ सुरू करता येत नाहीत म्हणून हजारो छोट्या आणि मध्यम उद्योगांना राज्य मुकले आहे. हे विधान किंवा खरेतर निरीक्षण धाडसी वाटेल की महाराष्ट्रात पारंपरिक उद्यमशिलता घुसमटते आहे. पारंपरिक म्हणजे स्टार्टअप नसलेले. आपले मुख्य उद्योग पारंपरिकच असतात. पण स्टार्टअप्सच्या गदारोळात पारंपरिक नवउद्योगांची मालिका आता क्षीण झाली आहे किंवा बहुतेक खंडित झाली आहे. याचे एक मुख्य कारण औद्योगिक वसाहतीमध्ये सामान्य लोकच काय, प्रस्थापित उद्योगांनादेखील आता जागा घेण्याचे धाडस करवत नाही. जागा उपलब्ध नाहीत ही अडचण नाही. अडचण तुमची तुम्ही समजून घ्या. औद्योगिक वसाहतींमधल्या रस्त्यांच्या कहाण्या करुण आहेत. महिला-पुरुषांसाठी सार्वजनिक शौचालये प्रगत राज्यातल्या औद्योगिक वसाहतींमध्ये आजही नाहीत.

महाराष्ट्रातली वीज देशात सर्वात महाग आहे. वीजपुरवठ्याची गुणवत्ता सर्वोत्तम आहे असा दावा केला जातो. त्यावर वाचणाऱ्यांनी अनुभव सांगावेत. असे किती मुद्दे सांगू? तामिळनाडूमध्ये महाराष्ट्रापेक्षा १३,१८२ अधिक कारखाने आहेत! गुजरात दुसऱ्या क्रमांकावर आलाय. महाराष्ट्रापेक्षा गुजरातमध्ये सुमारे चार हजार कारखाने जास्त आहेत. उदाहरणार्थ गुजरात राज्याने वस्तूंच्या निर्यातीमध्ये मारलेली मुसंडी हा अपघात नव्हे. गुजरातने कमालीचे प्रयत्न करून उद्दिष्ट ठरवून मोठी मजल मारली आहे. गुजरातने राज्याची उत्पादकता वाढवण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे, हे आकडेवारी सांगते. गेल्या महिन्यातलेच एक भन्नाट उदाहरण आहे. गुजरात सरकारने एक सर्वे केला. राज्यातल्या किती छोट्या उद्योगांना कर्ज मिळायला अडचणी येतात. त्याची कारणमीमांसा काय आहे? सरकारच्या विविध योजनांची माहिती लघु आणि मध्यम उद्योगांना आहे काय? नसेल तर कोणत्या मार्गाने ती माहिती पोहोचवता येईल? सरकारी यंत्रणा केवळ सर्वे करून थांबली नाही. कार्यवाही तत्काळ सुरू केलीय. कामांचे वाटपदेखील केले. सरकारच्या कोणत्या खात्याने काय जबाबदारी घ्यायची वगैरे. तामिळनाडू सरकारचे एक पत्रक मी दोन वर्षांपूर्वी वाचल्याचे आठवते. तमूक तमूक औद्योगिक वसाहतीमध्ये छोट्या उद्योग उभारणीचे पार्क आम्ही बनवत असून तिथे गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना खास सवलती, सबसिडी वगैरे. या अशा प्रयत्नांना महाराष्ट्रातले उद्योग गेली अनेक वर्षे तहानलेले आहेत. आपण समृद्ध आहोत. आपण सर्वाधिक आकर्षक आहोत, असे समज अधिक काळ करून घेऊन चालणार नाही. महाराष्ट्राची औद्योगिक गती मंदावते आहे हे प्लिज मान्य केले पाहिजे.

■ **सुधीर मुतालिक,** उद्योजक, नाशिक